दैनिक
# इनशॉट जळगाव

संपादक : संदिप महाले    inshotjalgaon@gmail.com

शनिवार | ८ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ३ | अंक - १६३ | पृष्ठे - ८ | किंमत - २ रु. RNI : MAHMAR/2024/89643


## शाळेतील वादातून थेट विद्यार्थ्यावर चॉपर हल्ला

### अल्पवयीन आरोपीची बालसुधार गृहात होणार रवानगी

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या किरकोळ वादातून थेट चॉपरसारख्या जीवघेण्या शस्त्राचा वापर झाल्याची धक्कादायक घटना जळगावात घडली आहे. परिसरात एक शाळेजवळ सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास हा प्राणघातक हल्ला झाला.

या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा आणि अल्पवयीन मुलांमधील वाढत्या गुन्हेगारी वृत्तीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून संपूर्ण शहर हादरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शाळेजवळ सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास विद्यार्थ्यांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन एका अल्पवयीन विद्यार्थ्याने आयुष भोपळे या विद्यार्थ्यावर



चॉपरने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले.

घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. जखमी मुलाच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हल्ला करणारा आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याला बाल न्याय मंडळासमोर हजर करून पुढील बालसुधार गृहाची कारवाई केली जाणार आहे. घटनेच्या वेळी उपस्थित असलेले इतर विद्यार्थी आणि शाळा प्रशासनाकडून पोलीस अधिक माहिती घेत आहेत. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हल्ल्याचा नेमका घटनाक्रम स्पष्ट केला जात आहे. शाळेच्या अगदी जवळ आणि दिवसाढवळ्या असा प्राणघातक हल्ला झाल्याने इतर पालकांमध्ये प्रचंड भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळा परिसरात पोलिसांनी नियमित गस्त वाढवावी आणि घातक शस्त्रे बाळगणाऱ्या टवाळखोरांवर कठोर कारवाई करावी, अशी आक्रमक मागणी नागरिक व पालकांकडून केली जात आहे.

## ६ लाखांहून अधिक खात्यांमध्ये कर्जमाफीची रक्कम जमा

### कर्जमाफीबाबत मुख्यमंत्र्यांनी दूर केला मोठा गैरसमज

**दैनिक इनशॉट जळगाव**
**मुंबई । वृत्तसंस्था**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये ५ हजार २९ कोटी रुपयांचा पहिला हप्ता जमा करून त्यांची खाती नील करण्यात आली आहेत. आषाढीच्या मुहूर्तावर जाहीर केलेल्या यादीनुसार आधार ऑथेंटिकेशन आणि ॲग्रीस्टॅक नंबरच्या आधारे कोणतीही क्लिष्ट अर्ज प्रक्रिया न ठेवता थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (डीबीटी) ही रक्कम वर्ग करण्यात आली असून, येत्या महिनाभरात उर्वरित सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिली.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक पार पडली. या बैठकीला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह सर्व जिल्ह्यांचे पालकमंत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीच्या अंमलबजावणीची विस्तृत माहिती दिली. कर्जमाफीच्या रकमेबाबत सुरुवातीला शेतकऱ्यांमध्ये झालेल्या गैरसमजावर मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले. काही शेतकऱ्यांच्या खात्यावर मूळ कर्जापेक्षा एनपीए (नॉन-परफॉर्मिंग असेट्स) मुळे लागलेले व्याज जास्त दिसत होते. मात्र, शासनाच्या सूचनेनुसार बँकांनी हे जास्तीचे व्याज पूर्णपणे रद्द केले आहे. त्यामुळे आता शासनाने भरलेली रक्कम आणि प्रत्यक्ष कर्ज खात्यातील रक्कम जुळली असून खाती नील झाली आहेत. सध्या जवळपास १८ ते १९ लाख खात्यांची पडताळणी प्रक्रिया गतिमानतेने सुरू आहे.

या प्रक्रियेत बँकांनी केलेल्या तांत्रिक चुकांमुळे सुमारे १२ लाख खाती बँकांकडे सुधारणेसाठी परत पाठवण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने नावांमधील विसंगती, क्रमांकांचा मिसमॅच आणि काही ठिकाणी आलेली दुबार खाती या त्रुटींचा समावेश आहे. बँकांनी या त्रुटी आठवडाभरात सुधारण्याचे आश्वासन दिले असून, ही संपूर्ण यंत्रणा डिजिटल असल्याने प्रत्येक खात्याची संपूर्ण व्हेरिफाय (पडताळणी) झाल्याशिवाय निधी जात नाही,

## महाविद्यालयाच्या इमारतीचा स्लॅब कोसळला; एक मजूर ठार

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जालना । वृत्तसंस्था**

जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील अन्वा रोडवर असलेल्या राजकुवर महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचा स्लॅब कोसळून एक मोठी दुर्घटना घडली आहे. शुक्रवारी सायंकाळी बांधकाम सुरू असताना अचानक स्लॅबचा काही भाग खाली कोसळला. या भीषण दुर्घटनेत मलब्याखाली दबून एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, अन्य चार मजूर जखमी झाले आहेत. जखमींपैकी एकाची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, या अचानक घडलेल्या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

महाविद्यालयाचे बांधकाम सुरू असताना स्लॅब कोसळल्याने अनेक मजूर मलब्याखाली अडकले आणि घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, इतर कामगार आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने धाव घेतली. नागरिकांनी जीवाची पर्वा न करता जेसीबीच्या साहाय्याने शर्थीचे प्रयत्न करत मजुरांना बाहेर काढले. या दुर्घटनेत मोतीलाल रामजी मिरगे (वय ५०, रा. मुठाड, ता. भोकरदन) यांचा मृत्यू झाला. तर कृष्णा नामदेव हिरे (वय ३०, रा. दगडवाडी), कृष्णा विठ्ठल शिंदे (वय ४०, रा. वाकडी), फारुख खा शारूख खा (वय ३८, रा. दानापूर) आणि लक्ष्मण गणेश ठोंबरे (वय ३०, रा. सुरंगळी) हे चार जण जखमी झाले आहेत.

## मिसिंग लिंक बोगद्यात भीषण अपघातात तरुण ठार

### काँग्रेसचे युवा नेते तुषार भूमकर यांचा जागीच मृत्यू

**दैनिक इनशॉट जळगाव**
**मुंबई । वृत्तसंस्था**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील मिसिंग लिंकच्या बोगद्यात शुक्रवारी रात्री दीड वाजेच्या सुमारास झालेल्या एका अत्यंत भीषण अपघातात पुण्यातील वाकड येथील काँग्रेसचे युवा नेते तुषार भूमकर यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. पुण्याहून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या त्यांच्या फॉर्च्युनर कारने पुढे जाणाऱ्या एका भाजीपाल्याच्या मालवाहू टेम्पोला मागून जोरदार धडक दिल्याने हा अनर्थ ओढवला. ही धडक इतकी भयंकर होती की यात फॉर्च्युनर आणि टेम्पो या दोन्ही वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला असून, या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला आहे, तर सुदैवाने अन्य तिघे सुखरूप बचावले आहेत.

तुषार भूमकर हे पुण्यातील वाकड परिसरातील रहिवासी असून, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात काँग्रेस पक्षाचे एक अभ्यासू व अत्यंत सक्रिय युवा नेते म्हणून त्यांची ख्याती होती. सामाजिक उपक्रमांमधील सहभाग, स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक आणि पक्षाच्या संघटनात्मक बांधणीत ते नेहमीच आघाडीवर असत. तरुणांमधील दांडगा



जनसंपर्क आणि सामाजिक कार्यातील सातत्यपूर्ण पुढाकार यामुळे त्यांनी स्थानिक राजकारणात आपली एक स्वतंत्र आणि भक्कम ओळख निर्माण केली होती.

तुषार भूमकर यांच्या अचानक झालेल्या अपघाती निधनाचे वृत्त समजताच मित्रपरिवार, स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला असून, अनेकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या भावनांना वाट मोकळी करून देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. तुषार यांच्या अशा अकाली जाण्याने संपूर्ण वाकड परिसरासह काँग्रेस पक्षाच्या स्थानिक वर्तुळात मोठी शोककळा पसरली असून, एका उमद्या युवा नेतृत्वाचा करुण अंत झाल्याची हळहळ व्यक्त होत आहे.

# माफी पुरेशी नाही... जबाबदारीही हवी!

'नीट' पेपरफुटीविरोधात राजधानी नवी दिल्लीतील 'जंतर मंतर' येथे कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी आंदोलन धगधगत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंदोलकांशी व एकूणच विद्यार्थ्यांशी संवाद साधणारी एक पोस्ट समाज माध्यमांवर प्रसारित केली होती. 'फेसबुक'च्या व्यासपीठावर देखील ती प्रसारित करण्यात आली. मात्र, काही काळासाठी ती पोस्ट 'फेसबुक'वरून दिसेनाशी झाली होती.या संदर्भात केंद्र सरकार आणि फेसबुकसह, इन्स्टाग्राम व व्हॉट्सअॅप यांची मालकी असलेली 'मेटा' कंपनी यांच्यात अल्पकालीन संघर्ष झाला नि त्याची परिणती 'मेटा'चे सीईओ मार्क झुकरबर्ग यांच्या माफीनाम्यात झाली. हा झाला या प्रकरणाचा वर्तमान तपशील. सोशल मीडिया नामक चावडीवरील चरकात हरक्षणी काही ना काही पडत असते.

सोशल मीडिया कंपन्यांच्या हाती त्याद्वारेच बक्कळ पैसा येतो. अशा या कंपन्यांनी काही किमान गोष्टी पाळण्याची अपेक्षा असते; मात्र या अपेक्षा पाळल्या जातातच असे नाही. पंतप्रधान मोदी यांच्या पोस्टबाबत तेच झाले. आणि अर्थातच हा मुद्दा फेसबुकवर रोज पडणाऱ्या कोट्यवधी पोस्टचा नव्हे, तर जगातील एका विशाल लोकशाही देशाच्या - जो देश फेसबुकला अवाढव्य बाजारपेठ देतो - सर्वोच्च नेतृत्वाने केलेल्या पोस्टचा होता. त्यामुळे भारताने याबाबत ठाम भूमिका घेतली आणि झुकरबर्ग यांना माफी मागावी लागली. ती अत्यावश्यकच होती. बलाढ्य कंपन्यांच्या मग्रुरीला, मनमानीला चाप लावणारी होती. मात्र, हा विषय झुकरबर्ग यांच्या माफीने संपणारा नाही. सोशल मीडिया कंपन्यांच्या एकंदरीत व्यवहारात, कारभारात अतिशय कळीचा मुद्दा 'सेफ हार्बर स्टेटस'चा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पोस्टचे प्रकरण निर्दशनास आल्यानंतर 'मेटा'वर टीकेची स्वाभाविक झोड उठली होती. त्या वेळी, तांत्रिक बिघाडाची ढाल कंपनीने पुढे केली. मात्र, या प्रकरणात झुकरबर्ग यांनी माफी न मागितल्यास मेटा कंपनीला 'सेफ हार्बर स्टेटस'ला मुकावे लागेल, असा इशारा संसदीय समितीने दिला होता. ही मात्र चांगलीच लागू झाली असावी. हे स्टेटस असल्यास, सोशल मीडियाच्या चावडीवर कुणीही, काहीही लिहिले, बोलले तरी त्याची थेट जबाबदारी संबंधित कंपनीवर नसते. अनुचित, वादग्रस्त पोस्टच्या जबाबदारीपासून कंपनी हात झटकू शकते. ही इतकी प्रभावी कवचकुंडले जाणे म्हणजे सोशल मीडिया कंपन्यांसाठी डोकेदुखीच. भारतात फेसबुक म्हणजे 'मेटा'च्या मागे ही डोकेदुखी उद्भवू नये, यासाठीचे पाऊल या अंगाने झुकरबर्ग यांच्या या माफीनाम्याकडे पाहता येईल. पंतप्रधान मोदी यांच्या पोस्टच्या प्रकरणाचा संदर्भ निराळा असला तरी त्यामुळे 'सेफ हार्बर स्टेटस'चा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आल्यास नवल नाही. राजकीय, सामाजिक व इतर अनेक अंगांनी भोवताल सतत 'व्होलाटाइल' असा असताना तो अधिक चेतवण्यास कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टींना आळा बसणे गरजेचे. या 'सेफ हार्बर स्टेटस'चा मुळातूनच फेरविचार केंद्राच्या पातळीवर होणार आहे, ही बाब त्या दृष्टीने महत्त्वाची. या प्रकरणी, मोदी यांच्या पोस्टप्रकरणाइतकाच, किंबहुना त्याहीपेक्षा काकणभर अधिकच महत्त्वाचा असा मुद्दा समोर आला आहे तो 'मेटा'ने दिलेल्या कबुलीचा. बाल लैंगिक अत्याचाराशी संबंधित मजकूर-चित्रे, डीपफेक, नियमभंग करणारा आशय यावर पाळत ठेवणे, आक्षेपार्ह पोस्ट हटवणे अशा कृती 'मेटा'कडून अपेक्षित आहेत. मात्र, त्यात त्रुटी असल्याची कबुली 'मेटा'ने दिलेली आहे. बाल लैंगिक अत्याचार, शोषण हा केवळ भारतात नव्हे, तर जागतिक पातळीवरील चिंतेचा विषय. असे असताना, 'मेटा'सारख्या बलाढ्य कंपनीने त्याबाबत ढिलाई दाखवणे केवळ अक्षम्य असे आहे. त्यामुळे या कबुलीनंतर असले प्रकार रोखण्यासाठी 'मेटा'ने तातडीने पावले टाकायला हवीत.'मेटा'ची दुसरी कबुली 'पेड प्रमोशन'ची; ती 'निलाजरी' म्हणावी अशी आहे. पैशांसाठी वाट्टेल त्या गोष्टींची केवळ भलामणच नव्हे, तर त्यांचा उदोउदो करणे ही कुठली व्यावसायिकता? अल्गोरिदम नामक रचनेशी हवे तसे खेळायचे आणि स्वतःच्या तुंबड्या

# रावसाहेब दानवेंचे वय आता राज्यपाल होण्याचे...

## आमदार बबनराव लोणीकरांचे सूचक विधान

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**



भाजप नेते आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी आता राज्यपाल व्हावे, त्यासाठी आमच्या सगळ्यांचा पाठिंबा असल्याचे सूचक विधान भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. ते म्हणाले, रावसाहेब दानवे यांचे आता वय आता राज्यपाल होण्याचे झाले असून त्यांनी आता राज्यपाल व्हावे, त्यासाठी आमच्या सगळ्यांचा पाठिंबा आहे. ते जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडीनंतर आयोजित कार्यक्रमात बोलत होते.


यावेळी बोलताना बबनराव लोणीकर म्हणाले, मी विधानसभा निवडणूक लढवणार नसल्याची घोषणा केली असली तरी राजकारणावर फार काही विश्वास ठेवू नका. मी राजकारणातून निवृत्त होणार नाही. मात्र, एकदा परभणी मतदारसंघातून खासदार व्हायची इच्छा असल्याचे देखील लोणीकरांनी यावेळी इच्छा व्यक्त केली आहे.

पुढे बोलताना बबनराव लोणीकर म्हणाले, मी परभणीवर क्लेम केला आहे. ८० वर्षांचा होऊ द्या नाहीहटर १०० वर्षांचा होऊ द्या, रिटायर कोणाला व्हावे वाटते. खोतकर साहेबांच्या घरी बसल्यावर त्यांच्या चिरंजीवाने म्हटले की भाऊ तुम्ही घोषणा केली. शेवटी पोरं मोठी झाली आहेत. रिटायर होऊच वाटत नाही. प्रकाशदादा सोळंकेंनी घोषणा केली होती की ते ८० वर्षांचे आहेत. मी आता निवडणूक लढणार नाही. आमचा पुतण्या निवडणूक लढवेल. नंतर सांगितले की लोकांचा आग्रह आहे. जनतेची इच्छा आहे. पक्षाने जबाबदारी दिली तर पुन्हा मीच लढेन, असा किस्सा देखील लोणीकरांनी यावेळी सांगितला.

तसेच एकदा दिवंगत अंकुशराव टोपे यांची माझी भेट झाली होती. त्यावेळी राजकारणाचा आता कंटाळा आला असे म्हणालो होतो. त्यावेळी ते म्हणाले की बबनराव घाई नका, मीच फसलो आहे. तुम्ही फसू नका. तुम्ही काय घोषणा करू नका. माझी इच्छा आहे खासदार व्हायची, मंत्री व्हायची, पण आता होता येते का? असे ते म्हणाले होते, असाही एक किस्सा लोणीकर यांनी सांगितला.

## निधन वार्ता काशीराम पाटील (के.डी.पाटील)

जळगाव : प्रतिनिधी



शहरातील शाहुनगर दत्त कॉलनी परिसरातील रहिवासी असलेले सेवानिवृत्त रेल्वे अधिकारी काशीराम देवाजी पाटील वय-९० यांचे शुक्रवार दि.७ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. काशीराम यांच्या यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते महेंद्र पाटील यांचे वडील आणि चेतन वाणी यांचे आजेसासरे होते. अंत्ययात्रा उद्या दि.८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरून नेरी नाका स्मशानभूमी येथे जाणार आहे.

## हाथी चले बाजार, बाकी पुढचे बोलत नाही

**मुंबई** – विद्यार्थ्यांना रस्त्यावर मारहाण झाल्याच्या घटनेनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह संसदेत फिरकले नसून ते गायब असल्याचा आरोप करत विरोधकांनी त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मात्र विरोधकांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शाह यांची पाठराखण केली असून, अमितभाई बोलतील तेव्हा हे पळून जातील, नक्षलवाद, कलम ३७० काढून टाकलेल्या अमितभाईंना देशभक्ती दुसऱ्यांनी त्यांना शिकवण्याची आवश्यकता नाही, असे सडेतोड विधान त्यांनी केले आहे.

# स्मार्ट मीटर म्हणजे स्मार्ट लूट; जुने मीटर पूर्ववत बसवण्याची मागणी

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**धरणगाव । प्रतिनिधी**



राज्यभरात बसवले जाणारे स्मार्ट मीटर म्हणजे ग्राहकांची स्मार्ट लूट असून, यामुळे वीज बिलात दुप्पट-तिप्पट वाढ होत असल्याचा घणाघाती आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने बुधवारी (दि. ५ ऑगस्ट) धरणगाव महावितरण कार्यालयावर भव्य धडक मोर्चा काढण्यात आला. पक्षाचे उपनेते गुलाबराव वाघ यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात हजारो नागरिक, व्यापारी आणि पक्षाचे पदाधिकारी आक्रमकपणे सहभागी झाले होते.

सकाळी ११.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून या मोर्चाला सुरुवात झाली. ङ्गङ्गनवे नको, जुनेच हव, स्मार्ट मीटर बंद करा, ग्राहक एकता जिंदाबाद अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मोर्चा महावितरण कार्यालयावर धडकल्यानंतर वीज बिलांमधील वाढ, पारदर्शकतेचा अभाव आणि वारंवार होणारा विजेचा लपंडाव यावरून अधिकाऱ्यांना तीव्र शब्दांत जाब विचारण्यात आला. या आंदोलनात शिवसेना तालुकाप्रमुख जयदीप पाटील, शहरप्रमुख भागवत चौधरी, नगरसेवक लक्ष्मण माळी, सुनील चौधरी, परमेश्वर महाजन, माजी जि. प. उपाध्यक्ष जानकीराम पाटील, किरण अग्निहोत्री, नगरसेविका हेमांगी अग्निहोत्री यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्मार्ट मीटर हटवून जुने मीटर लावा अनेकांच्या घरांमध्ये ग्राहकांची पूर्वसंमती न घेता जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. कमी वापर असतानाही दुप्पट-तिप्पट बिले येत असल्याने सर्वसामान्य नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे ज्या घरांमध्ये स्मार्ट मीटर लावले आहेत, ते तात्काळ काढून त्या ठिकाणी पूर्ववत डिजिटल मीटर लावावेत आणि वाढीव बिलाची रक्कम परत करावी, अशी मागणी केली.

दैनिक इनशॉट जळगाव हे वृत्तपत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक संदिप प्रकाश महाले यांनी परेश प्रिंटर्स, डी.८७, गोपाल दाल मिल, एमआयडीसी, जळगाव ४२५००२ येथून प्रसिध्द केले. संपादक - संदीप प्रकाश महाले RNI: MAHMAR/2024/89643

Daily Inshot Jalgaon Printed, published and Owned by sandeep prakash mahale, and printed at Paresh printed at D-87 gopal dal mill, Midc Jalgaon-425002.Editor - sandeep prakash mahale - RNI: MAHMAR/2024/89643

# स्मार्ट मीटरमधून ऑटो डिस्कनेक्ट तरीही वीजचोरी

## जळगाव शहरात तीन जणांवर गुन्हे दाखल

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

स्मार्ट मीटर बसवलेल्या ग्राहकांचा थकबाकीपोटी महावितरणने वीजपुरवठा खंडित केला. मात्र या ग्राहकांनी वीजबिल न भरता परस्पर जोडणी घेऊन वीजचोरी केली. शहरातील अशा ३ ग्राहकांवर महावितरणने थेट पोलिसांत गुन्हे दाखल केले आहेत.

श्रीराम चौकातील प्रतिभा रितेश पवार या ग्राहकाचा वीजपुरवठा थकबाकीसाठी स्मार्ट मीटरमधून ऑटो डिस्कनेक्ट (आपोआप खंडित) केलेला होता. मात्र त्यानंतरही त्यांनी थकबाकी केली नाही. महावितरणच्या पथकाने तपासणी केली असता या ग्राहकाने घरासमोर असलेल्या लघुदाब वीज वाहिनीवर आकडा टाकून वीजचोरी केल्याचे आढळले.

या ग्राहकाने ९ हजार ७०० रुपयांची वीजचोरी केली. दुसऱ्या प्रकरणात आशाबाबा कॉलनीतील लक्ष्मी भानुदास बागडे या ग्राहकाने थकबाकीसाठी स्मार्ट मीटरद्वारे वीजपुरवठा खंडित असतानाही वीज वाहिनीवर आकडा टाकून अनधिकृत वीजवापर केला. या ग्राहकाने ३४




हजार रुपयांची वीजचोरी केली. तर शिव कॉलनीतील स्वप्नील प्रशांत सैंदाणे यानेही वीजपुरवठा थकबाकीची खंडित असताना अनधिकृपणे वीजवापर केला. त्याने ३८ हजार ८५० रुपयांची वीजचोरी केली. महावितरणचे उपकार्यकारी अभियंता दिलीप मराठे यांच्या फिर्यादीवरून या ३ जणांवर जिल्हापेठ पोलिस ठाण्यात ७ ऑगस्ट रोजी भारतीय विद्युत कायद्याच्या कलाम १३५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले.

दरम्यान, थकबाकीसाठी वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांनी आपली वीजबिले तातडीने भरून सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केला आहे.

थकबाकीसाठी वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांची पडताळणी करण्यासाठी महावितरणने पथके स्थापन केली आहेत. वीजपुरवठा परस्पर जोडल्याचे या पथकांना आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा महावितरणने दिला आहे. तसेच अनधिकृतपणे वीजपुरवठा जोडल्यास प्राणांतिक अपघाताचाही धोका आहे. त्यामुळे वीजपुरवठा अनधिकृतरीत्या जोडू नका. वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांना शेजाऱ्यांनीही अनधिकृतरीत्या वीजपुरवठा देऊ नये. नसता त्यांचाही वीजपुरवठा खंडित करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे महावितरणने कळवले आहे.

# अभोडा येथे गोमांस विक्रीवर पोलिसांची धाड

## रावेर पोलिसांची कारवाई

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**रावेर । प्रतिनिधी**

रावेर पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने आभोडा गावात गोमांस विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत मोठ्या प्रमाणात गोमांस व साहित्य जप्त केले आहे.

पोलीसांना गुप्त माहिती मिळाल्यानुसार अभोडा बसस्टँड परिसरात गोवंशाची कत्तल करून गोमांस विक्री सुरू असल्याचे समजले. त्यानुसार पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शन खाली उपनिरीक्षक मनोज महाजन यांच्या नेतृत्वाखालील गुन्हे शोध पथकाने धाड टाकली. या कारवाईत उस्मान हसन कुरेशी (वय ४८, रा. आमोदा) याला ताब्यात घेण्यात



आले. त्याच्या ताब्यातून अंदाजे ३०० किलो गोमांस, एक कुऱ्हाड व सुरे असा सुमारे ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, आमोदा गावातील चावडी भागातही गोमांस विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथेही छापा टाकला. मात्र, संशयित इरफान रेहमान उर्फ लंगड्या कुरेशी (वय ३२, रा. आमोदा) हा पोलिसांची चाहूल लागताच पसार झाला. त्याच्या घरातूनही अंदाजे ३०० किलो गोमांस, एक कुऱ्हाड व सुरे जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मांसाचे नमुने पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रंजीत पाटील यांच्या उपस्थितीत घेण्यात आले असून उर्वरित मांसाची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली. पुढील तपास रावेर पोलीस करीत आहेत.



# १००८ नग सागाच्या लाकडांसह नॅनो कार जप्त

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

यावल वन विभागाच्या गस्ती पथकाने पहाटेच्या सापळा कारवाईत बेकायदेशीर वन उत्पादनाची वाहतूक करणारी नॅनो कार जप्त करत त्यातून १००८ नग साग अनघड बेलन हस्तगत केले. या प्रकरणी वाहनचालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला असून त्याचा शोध सुरू आहे.

वन विभागाच्या माहितीनुसार, गुरुवारी पहाटे २ वाजेपासून गस्ती पथकाने वरगव्हाण ते लोणी, पंचक रस्त्यावर सापळा रचला होता. सकाळी सुमारे ६.५० वाजता पांढ्या रंगाची नॅनो कार संशयास्पद कार गस्ती पथकाने पाठलाग करून साई मंदिराजवळील पकडली. चालक अंधाराचा फायदा घेत पसार झाला. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १००८ नग साग अनघड बेलन आढळून आले. जप्त वाहन व वन उत्पादन ताबा पावतीद्वारे मुख्य विक्री केंद्र, चोपडा येथे जमा करण्यात आले. ही कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी महेश पाटील, वनपाल के. एल. धनगर, वनपाल संजय पाटील, वनरक्षक सतीश वाघमारे, वनरक्षक आय. बी. चव्हाण आणि पोलिस हवालदार एस. आर. तडवी यांनी केली.

# विद्यार्थ्यांनो, स्वतःमध्ये संस्कार, शिस्त, अध्यात्मिक विचार रुजवा

## मंगळग्रह सेवा संस्थेंतर्गत मंगल बालसंस्कार केंद्रातर्फे विविध शाळांत मान्यवरांकडून आवाहन

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**अमळनेर। प्रतिनिधी**

येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच नैतिक मूल्ये, शिस्त, स्वच्छता आणि आध्यात्मिक विचार रुजले जाऊन त्यांची जपणूक व्हावी. तसेच आजच्या पिढीला केवळ शैक्षणिक नव्हे, तर उत्तम संस्कारज्ञानही देणे गरजेचे आहे.

या उद्देशाने बुधवार, दि. ५ ऑगस्ट व गुरुवार, दि. ६ ऑगस्ट रोजी शहरातील द्रौ. रा. कन्या शाळा तसेच



भगिनी मंडळ येथे मंगल बालसंस्कार केंद्रांतर्गत वर्ग घेण्यात आले. यामध्ये मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संस्कार, शिस्त आणि आध्यात्मिक विचारांची रुजवण कशाप्रकारे आपल्यामध्ये करायला हवी, याबाबतचे धडे देऊन ते अंगीकारण्याचे आवाहन केले.

मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनातून गेल्या तीन वर्षांपूर्वी मंगल बालसंस्कार केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्राच्या माध्यमातून दरवर्षी शहरातील विविध शाळांत बालसंस्कार वर्ग घेतले जातात. यंदा शहरातील द्रौ. रा. कन्या शाळेत बुधवारी, तर गुरुवारी भगिनी मंडळ येथे हे वर्ग घेण्यात आले.

सुरूवातीला खानदेश शिक्षण मंडळाच्या संचालिका सौ. वसुंधराताई लांडगे, मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सहसचिव दिलीप बहिरम, विश्वस्त डी. ए. सोनवणे, वेदशास्त्र संपन्न केशव पुराणिक, जयेंद्र वैद्य व शुभम वैष्णव यांच्या प्रमुख उपस्थितीत द्रौ. रा. कन्या शाळेत दीपप्रज्वलन करून सरस्वतीमातेच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना विविध मंत्र, बालगीते, बालगोष्टींसह एकूणच दिनचर्येबद्दल माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना संस्कारमय जीवनाचे महत्त्वही पटवून दिले.

कार्यक्रमास द्रौ. रा. कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सीमाताई सूर्यवंशी, पर्यवेक्षिका आर. एस. सोनवणे तसेच सर्व शिक्षक-शिक्षिकांसह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# नशामुक्त युवा विकसित भारत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समन्वयाने काम करावे

## केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे

दैनिक इनशॉर्ट जळगाव
**जळगाव । प्रतिनिधी**

युवकांमधील वाढत्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी जिल्ह्यासाठी व्यापक कृती आराखडा तयार करण्यात येत असून, शाळा-महाविद्यालयांपासून गाव-वॉर्ड पातळीपर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यासाठी ङ्ममाय भारत क्लबफ, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, ग्रामपंचायती, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग तसेच सामाजिक व आध्यात्मिक संस्थांनी सहभागी होऊन सर्वांनी समन्वयाने काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रिडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले.

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालयाच्या ङ्मनशामुक्त युवा विकसित भारतफ या राष्ट्रव्यापी अभियानाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज श्रीमती खडसे यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृष्य प्रणालीद्वारे पूर्वतयारी संदर्भात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करीष्मा नायर, माय भारतचे जिल्हा युवा अधिकारी अभिषेक चवरे आदींसह संबंधीत विभागाचे अधिकारी उपस्थित होते.





युवकांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी ङ्मप्रोटेक्ट, प्रिव्हेंट, रिकव्हरफ या त्रिसूत्रीवर भर देण्यात येणार आहे. पालक संवाद, समुपदेशन, डिजिटल डिटॉक्स, करिअर मार्गदर्शन, क्रीडा, योग, पारंपरिक खेळ, वाचन चळवळ, कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन आदी उपक्रमांद्वारे युवकांना सकारात्मक पर्याय उपलब्ध करून दिले जातील.

दर महिन्याला चार रविवार विविध उपक्रमांसाठी निश्चित करण्याचा प्रस्ताव आहे. पहिल्या रविवारी तज्ज्ञ मार्गदर्शन व जीवनकौशल्य प्रशिक्षण, दुसऱ्या रविवारी क्रीडा, योग, सायकल रॅली, ट्रेकिंग व सांस्कृतिक कार्यक्रम, तिसऱ्या रविवारी स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, रक्तदान व सामाजिक उपक्रम, तर चौथ्या रविवारी युवक महोत्सव, स्पर्धा, पुरस्कार व कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व गावांपर्यंत हे अभियान पोहोचविण्याचे उद्दिष्ट असून, प्रत्येक गावात ङ्ममाय भारत युवा क्लबफ स्थापन करण्यावर भर दिला जाणार आहे. व्यसनाच्या विळख्यात सापडलेल्या किंवा धोक्याच्या उंबरठ्यावर असलेल्या युवकांना कौशल्य विकास, रोजगार, समुपदेशन व पुनर्वसनाच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणले जाईल.

जिल्ह्यातील अमली पदार्थविरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे. संशयित बंद कारखाने, कुरिअर व टपाल व्यवस्था, प्रवासी बस तसेच इतर ठिकाणी तपासणी केली जात असून, अमली पदार्थांच्या पुरवठा साखळीचा शेवटपर्यंत माग काढण्यावर पोलिसांचा भर आहे. ङ्ममिशन राईजफ उपक्रमातून शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती केली जाणार आहे. या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी करावयाच्या आवश्यक कृतीचे सादरीकरण जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी यावेळी केले.

# विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीची पात्रता यादी १५ ऑगस्टपर्यंत सादर करा-पालकमंत्री गुलाबराव पाटील

## जिल्ह्यात ७,३५६ विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची होणार निवड; शासन निर्णयातील निकषांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश

दैनिक इनशॉर्ट जळगाव
**जळगाव । प्रतिनिधी**



जळगाव जिल्ह्यातील विशेष कार्यकारी अधिकारी () नियुक्ती प्रक्रियेला अंतिम स्वरूप देण्यासाठी शासन निर्णय दि. ३ फेब्रुवारी २०२५ व ११ फेब्रुवारी २०२५ मधील सर्व निकषांची काटेकोर पूर्तता करून पात्र उमेदवारांची यादी १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावी, असे स्पष्ट निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी सर्व उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी), तहसीलदार व संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच जिल्ह्यातील सर्व आमदारांनी आपापल्या मतदारसंघातील पात्र व्यक्तींचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करून या प्रक्रियेस सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती प्रक्रियेबाबत आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस आमदार अमोल जावळे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

२४ जुलैच्या बैठकीनंतर पालकमंत्र्यांकडून पुन्हा आढावा विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती प्रक्रिया विहित कालमर्यादेत आणि शासनाच्या निकषांनुसार पूर्ण व्हावी, यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी यापूर्वी २४ जुलै रोजी सर्व आमदार, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन नियुक्ती प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला होता. त्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेत पालकमंत्र्यांनी आता १५ ऑगस्टपर्यंत पात्रता यादी सादर करण्याचे निर्देश दिले. ङ्गपात्र, सेवाभावी आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तींचीच निवड व्हावी. विशेष कार्यकारी अधिकारी हा शासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे या पदावर प्रामाणिक, सेवाभावी, चारित्र्यसंपन्न, समाजाभिमुख आणि शासनाने निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता करणाऱ्या व्यक्तींचीच निवड झाली पाहिजे. नियुक्ती करताना कोणत्याही स्तरावर नियमांना बगल दिली जाऊ नये. प्रत्येक प्रस्तावाची काटेकोर छाननी करून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, गुणवत्ताधिष्ठित आणि तक्रारविरहित पद्धतीने राबवावी, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांनी प्राप्त प्रस्तावांची सखोल पडताळणी करून पात्र उमेदवारांची यादी निर्धारित मुदतीत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करावी. महिलांसाठी किमान ३३ टक्के प्रतिनिधित्व, लोकसंख्येनुसार निर्धारित निकष, उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण असणे तसेच आवश्यक चारित्र्य पडताळणी यासह शासन निर्णयातील सर्व अटींचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

सर्व आमदारांनी १५ ऑगस्टपर्यंत पात्र प्रस्ताव द्यावेत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्ह्यातील सर्व आमदारांना आपापल्या विधानसभा मतदारसंघातील पात्र उमेदवारांचे प्रस्ताव १५ ऑगस्टपर्यंत सादर करण्याचे आवाहन केले. अपात्र अथवा वादग्रस्त व्यक्तींची शिफारस टाळून लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने समन्वयाने काम करावे. संपूर्ण नियुक्ती प्रक्रिया कायदेशीर, पारदर्शक आणि तक्रारविरहित राहील, यासाठी प्रत्येक स्तरावर दक्षता घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नियुक्तीनंतर विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना त्यांचे अधिकार, कर्तव्ये, आचारसंहिता तसेच शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांबाबत आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांना ओळखपत्र व नियुक्ती प्रमाणपत्र तातडीने उपलब्ध करून द्यावे. शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा प्रचार-प्रसार, आपत्ती व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था, निवडणूक कार्य, जनजागृती मोहिमा आणि नागरिक सेवा उपक्रमांमध्ये विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांचा प्रभावी सहभाग सुनिश्चित करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या.

प्रक्रिया पारदर्शक व तक्रारविरहित राबवूफ जिल्हाधिकारी रोहन घुगे जिल्हाधिकारी रोहन घुगे म्हणाले की, विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोर पालन करण्यात येईल. प्राप्त प्रस्तावांची आवश्यक पडताळणी करून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, नियमानुसार आणि तक्रारविरहित पद्धतीने राबविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# जिल्ह्यात हर घर तिरंगा अभियान ९ ऑगस्टपासून प्रारंभ

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव। प्रतिनिधी**

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीने ङ्गहर घर तिरंगा अभियान-२०२६फ देशभरात ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणार आहे. यंदाचे अभियान ङ्गवंदे मातरम्-१५० वर्षेफ या संकल्पनेला समर्पित करण्यात आले असून, अभियानांतर्गत विविध देशभक्तीपर व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक कार्यक्रमात ङ्गवंदे मातरम्फ गीताचे सामूहिक गायन, राष्ट्रीय ध्वजाबाबत जनजागृती आणि देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय ध्वजाबद्दल नागरिकांमध्ये आदर, अभिमान व राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करणे, ङ्गवंदे मातरम्फच्या १५० वर्षांच्या स्मरणार्थ विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेणे, तसेच शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविणे, ही अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. विद्यार्थी, युवक, स्वयंसेवी संस्था, उद्योग, शासकीय विभाग आणि सर्वसामान्य नागरिकांनी या अभियानात व्यापक सहभाग नोंदवावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांनी केले आहे.



अभियानांतर्गत जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावर बाइक, सायकल व ई-बाइक तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. युवक मंडळे, विद्यार्थी, शासकीय अधिकारी, पोलीस, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांचा रॅलीत सहभाग राहणार आहे. रॅलीचे मार्ग स्वातंत्र्यसैनिक स्मारके व प्रमुख सार्वजनिक स्थळांमधून नियोजित करण्यावर भर देण्यात येणार आहे. वाहतूक आणि सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाशी समन्वय साधण्यात येणार असून, रॅलीची सुरुवात ङ्गवंदे मातरम्फच्या सामूहिक गायनाने करण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

नागरिकांनी . या संकेतस्थळावर सेल्फी विथ तिरंगा उपक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यंदा सेल्फीसोबत ङ्गवंदे मातरम्फगीताचा व्हिडिओही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी नागरिकांना तिरंग्यासोबत सेल्फी काढून तो डिजिटल माध्यमांवर अपलोड करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे.

अभियानाच्या निमित्ताने शासकीय कार्यालये, रुग्णालये, शाळा, पूल, धरणे, प्रमुख रस्ते, रेल्वे स्थानके, बसस्थानके, विमानतळ, चौक तसेच सार्वजनिक इमारतींवर तिरंगी रोषणाई व आकर्षक सजावट करण्याचे नियोजन आहे. शहरांबरोबरच गावांमध्येही देशभक्तीपर वातावरण निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

वंदे मातरम्फ या विषयावर मोठ्या आकाराच्या तिरंगी रांगोळ्या काढण्यास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेऊन प्रमुख सार्वजनिक ठिकाणी रांगोळी स्पर्धांचे आयोजनही करता येणार आहे. सामाजिक माध्यमे व स्थानिक माध्यमांच्या माध्यमातून या उपक्रमांचा व्यापक प्रसार करून नागरिकांचा अधिकाधिक सहभाग वाढविण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# जळगाव जिल्ह्यात ३१,९०८ पात्र शेतकऱ्यांसाठी १८४.१६ कोटी रुपये वितरित

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत जळगाव जिल्ह्यातील ३१ हजार ९०८ पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी १८४.१६ कोटी रुपये संबंधित बँकांच्या पूल खात्यात जमा करण्यात आले असून, ही रक्कम लाभार्थ्यांच्या कर्जखात्यावर वर्ग करण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.

या योजनेला २ जून,२०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर शासन निर्णयाद्वारे योजना जाहीर करण्यात आली असून १५ जुलै,२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेंच्या काही निकषांमध्ये अंशतः सुधारणा करण्यात आली आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राष्ट्रीयीकृत बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली आहे. जिल्ह्यातील एकूण ८७ हजार ८२६ कर्जखात्यांपैकी ६५ हजार ३४३ कर्जखाती पात्र ठरली असून, त्यांची पहिली यादी २५ जुलै,२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या यादीतील ७ ऑगस्ट,२०२६ अखेर ५० हजार ५१५ कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. त्यापैकी ३१ हजार ९०८ पात्र लाभार्थ्यांसाठी पहिल्या टप्प्यात १८४.१६ कोटी रुपयांचा निधी संबंधित बँकांच्या पूल खात्यात मुंबई येथील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते जमा करण्यात आला असून, तो लाभार्थ्यांच्या कर्जखात्यावर जमा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

शासनाने योजनेचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश सर्व बँकांना दिले आहेत. तसेच पहिल्या यादीतील उर्वरित पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यावरही लाभाची रक्कम वर्ग करण्यात येणार आहे. दरम्यान, ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी अद्याप झालेली नाही, त्यांची नोंदणी करण्यासाठी जिल्हयाचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या सूचनेनुसार जिल्हयात कॅम्प आयोजित करण्याच्या नियोजनाबाबत १० ऑगस्ट,२०२६ रोजी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव यांनी दिली आहे.

# संविधानापेक्षा जरांगे मोठा नाही - सदावर्ते

**दैनिक इनशॉट जळगाव**
**मुंबई । वृत्तसंस्था**

मनोज जरांगे ही कुणाची जहागीरदारी नाही. देशात संविधान लागू झाल्यापासून कुणीही पाटील किंवा राजा म्हणून बोलण्यासाठी शिल्लक राहिलेला नाही. मनोज जरांगेंनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा ५२ कुळ्या असा उल्लेख करून अत्यंत नीच भाषेत अपमान केला आहे. हा केवळ त्यांचा अपमान नसून राज्यातील तमाम ओबीसी, तेली आणि वंचित घटकांचा अपमान आहे. संविधानापेक्षा जरांगे मोठा नाही, त्यामुळे हा अपमान खपवून घेतला जाणार नाही, असा थेट इशारा ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी दिला आहे. आज आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सदावर्ते यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यासह राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्यावरही सडकून टीका केली.

सदावर्ते म्हणाले, ङ्गङ्घमनोज जरांगे एका लाइव्ह चॅनेलवर येऊन बावनकुळे यांना ५२ कुळ्या म्हणतो. हे ऐकून मंत्री उदय सामंत यांनी त्याला त्याचवेळी थांबवायला पाहिजे होते. पण ते गप्प राहिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कुणी ठाणे का रिक्षा म्हणालं तर त्यांना प्रचंड राग येतो, मग जरांगेने बावनकुळे आणि ओबीसी समाजाचा अपमान केलेला त्यांना कसा चालतो?

उपमुख्यमंत्री शिंदेंवर गंभीर आरोप करत सदावर्ते म्हणाले, ङ्गङ्घमनोज जरांगे हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाच लाडोबा

# शहीद जवानांच्या स्मारकांचे रविवारी भूमिपूजन

## क्रांती दिना निमित्त शहीद वीर माता-पिता, वीर पत्नींचा सन्मान; जळगावात कृतज्ञतेचा सोहळा

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव। प्रतिनिधी**

देशाच्या संरक्षणासाठी प्राणांचे सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर शहीदांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी क्रांती दिनाचे औचित्य साधून रविवारी ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृहात ङ्गशहीद स्मारक भूमिपूजन सोहळाफ आणि शहीद ङ्गवीर माता, वीर पिता, वीर पत्नी सन्मान सोहळाफ आयोजित करण्यात आला आहे. यावेळी जिल्ह्यातील २९ शहीद जवानांच्या स्मारकांचे भूमिपूजन करण्यात येणार असून त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान केला जाणार आहे.

देशाच्या सुरक्षिततेसाठी स्वतःचे वर्तमान अर्पण करणारे शहीद हे इतिहासाच्या पानांपुरते मर्यादित नसतात. त्यांचे बलिदान तिरंग्याच्या प्रत्येक रंगात आणि राष्ट्रभक्तीच्या प्रत्येक भावनेत सदैव जिवंत राहते. त्यांच्या सर्वोच्च त्यागाला कृतज्ञ अभिवादन करण्याची तसेच शहीद कुटुंबीयांप्रती ऋण व्यक्त करण्याची ही पवित्र संधी आहे.

या सोहळ्यास पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, केंद्रीय युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ यांच्यासह जिल्ह्यातील आमदार, लोकप्रतिनिधी, मान्यवर आणि विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत.

ज्या मातीत या वीर जवानांनी पहिले पाऊल टाकले, ज्या गावाने त्यांना संस्कार दिले आणि ज्या भूमीने राष्ट्रासाठी बलिदान देणारा सुपुत्र घडविला, त्या प्रत्येक शहीद जवानाच्या गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, युवक, महिला व ग्रामस्थांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आपल्या गावच्या वीर सुपुत्राला सामूहिक मानवंदना देणे, शहीद कुटुंबीयांच्या पाठीशी समाज खंबीरपणे उभा असल्याचा विश्वास देणे आणि नव्या पिढीसमोर देशभक्तीचा प्रेरणादायी आदर्श निर्माण करणे, ही प्रत्येक गावाची नैतिक जबाबदारी आहे.

जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिकांचे परिवार, वीरपत्नी, माजी सैनिक संघटना, एनसीसी कॅडेट्स, विद्यार्थी, युवक तसेच देशप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शहीदांच्या बलिदानाला कृतज्ञ अभिवादन करावे. ही केवळ उपस्थिती नसून राष्ट्रासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीरांना वाहिलेली जिवंत आदरांजली ठरेल, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

cmyk

# धानोरा ज्युनियर कॉलेजमध्ये मनविसे सदस्य नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

नामदेवराव भावसिंग पाटील ज्युनियर कॉलेज, धानोरा (ता. चोपडा, जि. जळगाव) येथे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या (मनविसे) सदस्य नोंदणी अभियानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सदस्य नोंदणी करून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि मनविसे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या विचारांशी जोडण्याचा निर्धार व्यक्त केला.



या अभियानादरम्यान विद्यार्थ्यांना मनविसेच्या विविध उपक्रमांची, विद्यार्थी हिताच्या धोरणांची तसेच संघटनेच्या कार्यपद्धतीची माहिती देण्यात आली. शिक्षण, रोजगार, विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि सामाजिक बांधिलकी या विषयांवर मनविसे सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यामुळे विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सदस्यत्व स्वीकारत अभियानात सहभाग नोंदविला.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना रावेर लोकसभा जिल्हाध्यक्ष कल्पेश राजेंद्र पवार, जिल्हा सचिव विष्णू कोळी, चोपडा तालुका उपाध्यक्ष नितीन कोळी, तसेच अमोल साळुंखे, अविनाश इंगळे, योगेश कोळी आणि वैभव चौधरी उपस्थित होते.

पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत संघटनेच्या आगामी उपक्रमांची माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि विविध प्रश्नांसाठी मनविसे कायम त्यांच्या पाठीशी राहील, असा विश्वास व्यक्त केला.

या सदस्य नोंदणी अभियानाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा विद्यार्थ्यांमध्ये मनविसेबद्दल वाढत असलेल्या विश्वासाचे प्रतीक असल्याची भावना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. भविष्यातही अशा स्वरूपाची सदस्य नोंदणी मोहीम जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भीषण अपघातात दोन दुचाकीस्वार ठार

**दैनिक इनशॉट जळगाव**
**नाशिक । वृत्तसंस्था**

जिल्ह्यातील देवळा तालुक्यामधील पिंपळगाव वाखरी शिवारात देवळा-मालेगाव रोडवर झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. मोटारसायकल आणि कार यांच्यात समोरासमोर झालेल्या धडकेत हा अपघात झाला. अपघातानंतर चारचाकी वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज संध्याकाळी सुमारे पाच वाजेच्या सुमारास हा अपघात झाला असून देविदास पांडुरंग देवरे (वय २६) आणि कैलाश पुंडलिक देवरे (वय ५५) दोघेही रा.धोबीघाट, दहिवड (ता. देवळा) हे मोटारसायकलवरून दहिवडकडून देवळ्याकडे जात होते. त्याचवेळी देवळ्याकडून दहिवडकडे जाणाऱ्या कारने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत मोटारसायकलवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर कारचा चालक वाहन घटनास्थळीच सोडून पसार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. घटनेची माहिती मिळताच देवळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी देवळा ग्रामीण रुग्णालयात हलवले आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# हद्दपार गुन्हेगारांनी जिल्ह्यात पाऊल टाकले तर थेट कारवाई

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

आगामी सण आणि उत्सवाच्या पार्श्वभूवर जिल्हा पोलीस दलाकडून कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यात यापूर्वीच हद्दपार करण्यात आलेले आणि जनमानसात दहशत निर्माण करणाऱ्या - ७ टोळ्यांतील १५ व इतर ३५ अशा एकूण ५० सराईत गुन्हेगार सण-उत्सवाच्या काळात जिल्ह्यात परत येऊ नयेत, म्हणून पोलिसांकडून त्यांच्यावर विशेष वॉच ठेवण्यात येणार असून त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार आहे. जिल्हा पोलीस अधिक्षकांकडून ५० हद्दपार असलेल्या गुन्हेगारांची नावे जाहिर करून, त्या-त्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नागरिकांपर्यंत पोहचविण्यात येणार आहेत. तसेच हद्दपारीच्या काळात जर हे हद्दपार आरोपी हद्दपारीच्या काळात दिसले तर त्यांच्याबाबतची माहिती पोलीसांना देण्याचे आवाहन जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे केले आहे.

जिल्ह्यात यापूर्वी एकूण ७ टोळ्यांमधील १५ गुन्हेगार आणि ३५ वैयक्तिक गुन्हेगार अशा एकूण ५० सराईत गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले असून, पोलीस प्रशासनाकडून त्यांच्या हालचालींवर कसून नजर ठेवली जात आहे. एमआयडीसी, एरंडोल, नशिराबाद, रामानंदनगर, जळगाव शहर, भुसावळ, पाचोरा, चाळीसगाव, भडगाव, जामनेर, चोपडा आणि धरणगाव परिसरातील जे गुन्हेगार यापूर्वीच हद्दपार करण्यात आले आहेत, त्यांच्यावर पोलीस ठाण्यांमार्फत सतत वचक ठेवला जात आहे. या सर्व ५० गुन्हेगारांना त्यांच्यावर निश्चित केलेल्या मुदतीपर्यंत जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश करण्यास, वास्तव्य करण्यास किंवा फिरण्यास मज्जाव आहे.

हद्दपार असतानाही कुणी जिल्ह्यात बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याचे निदर्शनास आल्यास, तो भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत अत्यंत गंभीर व दखलपात्र अपराध ठरवून तात्काळ अटकेची व कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील - आकाश उर्फ खंड्या ठाकूर, -पवन उर्फ बद्या बाविस्कर, आकाश उर्फ आक्या ब्रो मराठे, आकाश दहेकर, टारझन उर्फ बल्लू दहेकर, अमन उर्फ खेकडा रशिद सैय्यद, रवी चव्हाण, गुरुदयालसिंग टाक, गिरीष घुगे (वंजारी) तर शनिपेठ व शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील - भूषण अहिरे, तेजस सोनवणे, राकेश सपकाळे, फिरोज शहा, रामानंद नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील - अक्षय उर्फ बाब्या धोबी व सागर उर्फ भोला भोई यांचा समावेश आहे.

# प्रधान सचिव देओल यांची जिल्ह्यातील शाळांना भेट

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव। प्रतिनिधी**

राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल यांनी आज जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद तसेच खासगी शाळांना भेट देऊन शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा, शाळांमध्ये राबविण्यात येणारे विविध उपक्रम आणि शैक्षणिक वातावरणाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आवश्यक त्या ठिकाणी सुधारणा करण्याबाबत सूचना देत विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाला अधिक बळ देण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

या पाहणी दौऱ्यात उपयुक्त तुषार महाजन, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर, माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील, उपशिक्षणाधिकारी नरेंद्र चौधरी, विजय सरोदे यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

प्रधान सचिव रणजीतसिंह देओल यांनी यावल तालुक्यातील साकळी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळा, जिल्हा परिषद मराठी शाळा तसेच शारदा हायस्कूल येथे भेट देऊन वर्गखोल्या, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक साहित्य, स्वच्छता, डिजिटल सुविधा आणि शाळेतील एकूण वातावरणाची पाहणी केली. विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अध्ययनातील आवडी-निवडी, शैक्षणिक प्रगती, शालेय उपक्रम तसेच उपलब्ध सुविधांविषयी माहिती घेतली.



त्यानंतर त्यांनी पाळधी येथील जिल्हा परिषद शाळा, कन्या शाळा तसेच ए. टी. झांबरे विद्यालयाला भेट देऊन विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला. मुख्याध्यापक व शिक्षकांशी चर्चा करताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियमित उपस्थिती, वाचन संस्कृती, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम यांना अधिक चालना देण्याबाबत सूचना केल्या.

शाळांमध्ये मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक विद्यार्थ्याला आनंददायी, गुणवत्तापूर्ण आणि प्रेरणादायी शिक्षण मिळावे, यासाठी स्थानिक पातळीवर प्रभावी नियोजन करून विविध शैक्षणिक अभियानांची अंमलबजावणी करण्यावर त्यांनी भर दिला.

यावेळी प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील व माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांच्यासोबत जिल्ह्यातील शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. शाळांमध्ये गुणवत्ता वृद्धीसाठी, विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी तसेच नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी नवीन अभियान राबविण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. दौऱ्यादरम्यान शाळांतील शिक्षकांनी राबविलेल्या विविध उपक्रमांचे प्रधान सचिवांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत शिक्षणाची गुणवत्ता सातत्याने उंचावण्यासाठी प्रशासन, शिक्षक आणि पालक यांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

cmyk

# ग.स.चे शाखाधिकारी जगन्नाथ बाविस्कर यांचा सेवापुर्ती निमित्त सत्कार

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतसंस्था उर्फ ग.स.सोसायटीचे शाखाधिकारी जगन्नाथ बाविस्कर (गोरगावले बु) हे दि. ३१ जुलै २०२६ रोजी एकुण ३६ वर्ष ८ महिने १४ दिवसांची सेवा करून सेवानिवृत्त झालेत. त्यांच्या सेवापुर्ती निमित्त चोपडा ग.स.विभागातर्फे सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी अध्यक्ष सुनील सुर्यवंशी हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून विद्यमान



संचालक योगेश सनेर, मंगेश भोईटे, एकनाथ पाटील माजी विभागीय अधिकारी किरण पाटील यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक माजी विभागीय अधिकारी अशोक पाटील यांनी केले. मान्यवरांनी आपल्या भाषणात जगन्नाथ बाविस्कर यांच्या सर्वसमावेशक कार्याचा गौरव केला.

सेवापुर्ती सत्काराला उत्तर देतांना जगन्नाथ बाविस्कर यांनी प्रथमतः सहकारमहर्षी स्व.बी.बी. आबा पाटील यांचे व मायबाप ग.स.संस्थेचे उपकार मानलेत. संस्थेचे दिवंगत नेतेमंडळी व पदाधिकारी यांचे स्मरण करून विद्यमान नेतेमंडळी, पदाधिकारी व कार्यकारी मंडळ यांचे आभार मानलेत. श्री बाविस्कर यांना भडगाव, अमळनेर, यावल, एरंडोल, चोपडा येथे नोकरी करित असतांना त्या त्या ठिकाणचे सभासद व अधिकारी कर्मचारी वृंद यांचेही सहकार्य लाभले. श्री.बाविस्कर यांनी शाखाधिकारी पदावर असतांना विशेष म्हणजे थकबाकीदार सभासदांकडील सव्वा कोटींपेक्षाही जास्त थकबाकीची रक्कम वसूलीसाठी प्रयत्न केलेले आहेत.

या कार्यक्रम प्रसंगी चोसाका संचालक अनिल पाटील, डॉ.मोहन पाटील, देविदास पाटील, प्रेमनाथ बाविस्कर,श्रीमती.जावित्रीबाई बाविस्कर, सौ.आशाबाई बाविस्कर, वैभवराज बाविस्कर, सौ.दिपाली बाविस्कर, चोपडा ग.स. चे विभागीय अधिकारी दिलीप सपकाळे, शाखाधिकारी शितल मोरे, स्मिता मोरे, शरद पाटील, प्रविण सत्तेसा, चेतन सोनवणे यांचेसह सर्वच उपशाखाधिकारी, रोखपाल, लिपिक व कर्मचारी वृंद उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व कर्मचारी यांनी प्रयत्न केले. सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन रोखपाल उज्वल शिंदे यांनी केले.

## आज पारोळ्यात विविध विकासकामांचे भव्य लोकार्पण व भूमिपूजन

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**पारोळा । प्रतिनिधी**

शहराच्या विकासाला गती देणारा भव्य लोकार्पण व भूमिपूजन सोहळा शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक, उंदीरखेडा रोड, पारोळा येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात आमदार अमोल चिमणराव पाटील यांच्या शुभहस्ते शहरातील विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यात येणार आहे.

प्रमुख विकासकामे :

₹४ कोटी एलईडी स्ट्रीट लाईट व हायमास्ट दिवे बसविणे.

* ₹२.४० कोटी अमळनेर रोडचे काँक्रीटीकरण.

₹४१ लाख धुळे रोडलगतच्या स्मशानभूमीचे सुशोभीकरण.

₹१.२५ कोटी धरणगाव रोडलगतच्या स्मशानभूमीचे सुशोभीकरण.

₹१५ लाख लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारकाचे सुशोभीकरण.

गार्डन, उद्याने, महामार्ग व खुल्या जागांवर वृक्षारोपण.

या सोहळ्यास नगराध्यक्ष चंद्रकांत बी. पाटील, उपनगराध्यक्ष ॲड. रोहन वसंतराव मोरे, मुख्याधिकारी तुषार विठ्ठल नेरकर, गटनेते अमृत नाना चौधरी, गटनेत्या अलका धीरज महाजन तसेच सर्व नगरसेवक, नगरसेविका व नागरिक उपस्थित राहणार आहेत. पारोळा शहराच्या विकासातील हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पारोळा नगरपरिषदेतर्फे करण्यात आले आहे.

## महापालिकेची कार्यपद्धती समजून घेण्यासाठी नगरसेवक प्रशिक्षणाला रवाना

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव। प्रतिनिधी**

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वतीने जळगाव शहर महानगरपालिकेच्या नगरसेवकांसाठी नाशिक येथे शुक्रवार, दि. ७ आणि ८ ऑगस्ट रोजी दोन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नगरसेवकांना महानगरपालिकेच्या कामकाजाची प्रत्यक्ष कार्यपद्धती आणि नियमावलीबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

यंदाच्या महापालिकेत नवनिर्वाचित नगरसेवकांची संख्या मोठी आहे. नगरसेवकांना प्रशासकीय कामकाजाचा अनुभव मिळावा आणि महासभेत जनतेचे




नगरसेवक प्रशिक्षित असणे अत्यंत गरजेचे आहे. महापालिकेत विकासकामे मार्गी लावण्यासाठी आणि महासभेत लोकप्रश्न अभ्यासू पद्धतीने मांडण्यासाठी हे प्रशिक्षण नगरसेवकांसाठी मैलाचा दगड ठरेल.

**– दीपमाला काळे, महापौर (जळगाव शहर महानगरपालिका)**

प्रश्न प्रभावीपणे व अभ्यासू वृत्तीने मांडता यावेत, यासाठी महापौर दीपमाला काळे यांनी हे प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. यापूर्वी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते; मात्र आचारसंहितेमुळे ते पुढे ढकलावे लागले होते.

या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरासाठी शुक्रवारी (७ ऑगस्ट) सकाळी ७ वाजता नगरसेवक महानगरपालिकेच्या प्रांगणातून खाजगी बसने नाशिककडे रवाना झाले.

# धानोरा येथे ४५३ लाभार्थ्यांच्या उपस्थितीत मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

रोटरी क्लब जळगाव आणि गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ६ ऑगस्ट २०२६, गुरुवार रोजी धानोरा ता. चोपडा येथील सुर्यवंशी गुजर समाज सतपंथ मंदिर येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबीराला परिसरातील धानोरा, पंचक, मोहरद, पारगाव, चिंचोली, देवगाव, खोरगाव अडावद इ. गावातील महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. एकूण ४५३ महिलांनी व पुरुषांनी या




शिबीराचा लाभ घेतला.

शिबीरात महिलांसाठी आणि किशोरवयीन मुलींसाठी विशेष मोफत हिमोग्लोबिन तपासणी, औषध वाटप आणि आरोग्य समुपदेशन सर्वांसाठी मोफत दंत तपासणी आणि डोळे तपासणी विशेष सुविधा गरजू रुग्णांसाठी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन मान्यवरांची उपस्थिती शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी रोटरी क्लब जळगावचे अध्यक्ष ॲड. श्री. हेमंत भंगाळे, मानद सचिव श्रीमती स्वाती ढाके, डॉ. पराग जहागीरदार, डॉ. तुषार फिरके, डॉ. काजल फिरके, रोटे. संदीप शर्मा, डॉ. माधुरी कासट, डॉ. हर्षदा पाटील, डॉ. ज्योती चौधरी, डॉ. पवन बजाज, डॉ. हर्षवर्धन जोशी हे उपस्थित होते.

तसेच श्री. विजय जोशी, श्री. योगेश गांधी, श्री. सुबोध सराफ, राकेश चव्हाण, श्री. सुनील नानकर, सतपंथी मंदिर सेवा समितीचे श्री. विजय महाराज, श्री. गजानन चौधरी, श्री. सुरेंद्र महाजन, अध्यक्ष श्री. प्रदिप महाजन, श्री. वासुदेव महाजन उपस्थित होते.

गांधी रिसर्च फौंडेशन तर्फे श्री.गिरीश कुलकर्णी, श्री. सुधीर पाटील, श्री. प्रशांत सूर्यवंशी, श्री. चंद्रकांत चौधरी, श्री. विक्रम अस्वार यांनी शिबीराच्या पुर्वतयारी व आयोजनात मोलाचे सहकार्य केले.

गावकऱ्यांनी शिबीराबद्दल समाधान व्यक्त केले आणि अशा प्रकारचे आरोग्य शिबीर वेळोवेळी घ्यावेत अशी मागणी केली. शिबीर यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब, गांधी रिसर्च फाउंडेशन आणि सतपंथ मंदिर सेवा समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# गांधीविचार, आधुनिक तंत्रज्ञान,उद्योजकतेच्या संगमातून समृद्धीचा नवा मार्ग

## हरिजन सेवक संघाच्या राष्ट्रीय परिषदेस जैन हिल्सला प्रारंभ; सत्य, अहिंसा, समता आणि सामाजिक न्यायाचा जागर

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव। प्रतिनिधी**

सत्य, अहिंसा, समता, सेवा आणि स्वावलंबन या गांधीवादी मूल्यांना आधुनिक तंत्रज्ञान व उद्योजकतेची जोड देऊन समाजातील वंचित घटकांना सन्मानासोबत आर्थिक समृद्धी मिळवून देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. हरिजन सेवक संघाच्या राष्ट्रीय परिषदेस जैन हिल्सला प्रारंभ झाला. यावेळी महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून परिषदेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हरिजन सेवक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शंकरकुमार सन्याल तर जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन उद्घाटक होते. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा माजी खासदार नरेशकुमार यादव, डॉ. सुदर्शन अय्यंगार, माजी राज्य मंत्री संजय पासवान, महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष मोहन जोशी, जळगाव हरिजन सेवक संघाचे सचिव शंभु पाटील, सुधेंद्र कुळकर्णी, कुंवर



शेखर, पवनार आश्रमाच्या ज्योती दिदी या मान्यवरांची उपस्थिती होती. या परिषदेस देशभरातील गांधीवादी विचारवंत, कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी सर्वधर्म प्रार्थना झाली. त्यानंतर संत तुकडोजी महाराजांचे ईश्वर देश में तू, हर वेश में तूफ हे गीत प्रशांत सूर्यवंशी यांनी सादर केले. जळगाव हरिजन सेवक संघाचे सचिव शंभू पाटील यांनी प्रास्तविक केले तर महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी स्वागतपर भाषण केले. महात्मा गांधीजींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत ही परिषद होत असल्याचे सांगत, परिषदेतून गांधीजींचा सत्य, अहिंसा, समता, स्वच्छता आणि सर्वसमावेशकतेचा विचार आत्मसात करून समाजासाठी नवा विचार, नवा मार्ग आणि नवा कार्यक्रम घेऊन पुढे जाण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले. अशोक जैन व अनिल जैन यांनी श्रद्धेय. भवरलालजी जैन यांच्या गांधीवादी विचारांना पुढे नेत समाजसेवेचे कार्य करीत असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. शंकरकुमार सन्याल यांनी सांगितले की, ईसत्य, सेवा आणि समतेच्या मूल्यांवर आधारित समाजनिर्मिती हाच गांधी विचारांचा खरा वारसा असल्याचे सांगितले. संघर्षमय आणि अस्थिर होत चाललेल्या जगात गांधी विचार अधिक प्रासंगिक ठरत असून शांतता, सामाजिक न्याय, पर्यावरण संवर्धन, ग्रामीण विकास आणि मानवकल्याणासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहेफ असे त्यांनी स्पष्ट केले. हरिजन सेवक संघाने शिक्षण, आरोग्य, स्वावलंबन आणि सामाजिक समतेच्या माध्यमातून गांधींचे कार्य पुढे नेत असल्याचे सांगितले. तरुण पिढीने गांधी विचारांची सांगड आधुनिक ज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक जबाबदारीशी घालावी, असेही ते म्हणाले.

डॉ. सुदर्शन अय्यंगार यांनी गांधी विचारांच्या सखोल अभ्यासासोबतच रचनात्मक कार्य आणि ग्रामस्वराज्य बळकट करण्याची गरज व्यक्त केली. तंत्रज्ञानाचा विस्तार होत असताना त्यामागील ईतत्त्वफ जपले पाहिजे. सेवाभावात अहंकार न आणता समाजाच्या विकासात सहभागी होण्याची भूमिका स्वीकारली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. गांधींच्या प्रेमभावनेला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या न्यायाच्या संघर्षशील विचारांना एकत्र आणण्याची गरज असल्याचेही डॉ. अय्यंगार यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गांधी रिसर्च फाउंडेशनचे सहकारी डॉ. अश्विन झाला यांनी केले. परिषदेत सहभागी या सर्व मान्यवरांनी गांधी तीर्थ येथे भेट दिली. सायंकाळी जैन हिल्स येथे महात्मा गांधी यांच्या जीवन आणि विचारांवर आधारित बंदे में है दम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या परिषदेत सहभागी सर्वजण धुळे येथील कारागृहास भेट देणार आहेत जिथे विनोबा भावे व साने गुरुजींनी कारावास भोगला त्या भूमिला नमन करून दुपारी या परिषदेत संस्थेच्या पुढील वाटचालीसंदर्भात विचार विनिमय होणार आहे.

**वेस्ट टू वेल्थमधून नव्या संधी– अनिल जैन**

शेती आणि उद्योगातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संपत्तीत रूपांतर अर्थात ईवेस्ट टू वेल्थफ ही नव्या युगातील मोठी संधी आहे. कचऱ्यातून ऊर्जा, रोजगार आणि संपत्ती निर्माण करून वंचित घटकांना उद्योजक बनविता येऊ शकते. गांधीविचार, आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योजकतेची शक्ती यांची सांगड घालून सन्मान आणि समृद्धीचा नवा भारत घडविता येईल, असा विश्वास या कार्यक्रमाचे उद्घाटक जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष अनिल जैन यांनी व्यक्त केला. गांधी रिसर्च फाउंडेशनच्या माध्यमातून आजच्या भारताला आणि विशेषतः देशाचे भविष्य घडविणाऱ्या तरुण पिढीला गांधीजींचे विचार व मूल्ये पोहोचविण्यासाठी गांधीतीर्थची निर्मिती श्रद्धेय मोठ्याभाऊंनी केली आहे, असे ही नमूद केले. तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात सत्य, अहिंसा, समता, स्वावलंबन आणि मानवतेची मूल्ये तरुणांच्या मनापर्यंत पोहोचत आहे असे ही ते म्हणाले.

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवून तीन वर्षांपासून २१ वर्षीय तरुणीवर अत्याचार केला. ही धक्कादायक घटना शहरात उघडकीस आली. याप्रकरणी तरुणीने बाजारपेठ पोलिसात तक्रार दिली असून त्यानुसार तरुणासह त्याच्या आई-वडीलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील २१ वर्षीय तरुणीची संशयित आदित्य ब्रजेश वत्स याच्याशी ओळख होती. दोघेही पुण्यात शिक्षणासाठी असल्याने त्यांच्यात जवळीक निर्माण झाली. आरोपीने लग्नाचे आश्वासन देत ऑगस्ट ऑगस्ट २०२३ ते जुलै २०२६ दरम्यान, त्या तरुणाने पीडितेवर वेळोवेळी अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संशयिताने दि. ३० जून रोजी पल्सर दुचाकी खरेदीसाठी तरुणीकडून ऑनलाइन पद्धतीने सुमारे १ लाख १० हजार रुपयेही घेतले. त्यानंतर दि. १२ जुलै रोजी तरुणीने विवाहाबाबत विचारणा केली असता आरोपीन लग्नास नकार दिला. या घटनेनंतर तरुणीने बाजारपेठ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली त्यानुसार पोलिसांनी आदित्य ब्रजेश वत्स तसेच त्याच्या माता-पित्यांविरोधात संबंधित कलमान्वय गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# आयआयटी बॉम्बेतील दोन कॅन्टीन तात्काळ बंद

**दैनिक इनशॉट जळगाव**
**मुंबई । वृत्तसंस्था**

अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाची सूत्रे तुकाराम मुंढे यांनी हाती घेतल्यापासून संपूर्ण राज्यात धडक कारवाया सुरू झाल्या असून, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या हॉटेल आणि मेसवर कठोर कारवाईचा बडगा उगारला जात आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून एफडीएने आता आयआयटी बॉम्बेमधील दोन कॅन्टीनला स्टॉप बिझनेस नोटीस बजावून ती तात्काळ बंद करण्याची कारवाई केली आहे, तर आणखी एका तिसऱ्या कॅन्टीनला त्रुटी दूर करण्यासाठी सुधारणा नोटीस बजावली आहे.

बुधवारी करण्यात आलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत, भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या परवान्याविना चालवल्या जाणाऱ्या दोन कॅन्टीनवर व्यवसाय तात्काळ बंद करण्याची (स्टॉप बिझनेस) धडक कारवाई करण्यात आली. तर, वैध परवाना असूनही अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तिसऱ्या कॅन्टीनला त्रुटी दूर करण्यासाठी सुधारणा नोटीस बजावण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई एका तक्रारीच्या आधारे करण्यात आली होती. मात्र ही तक्रार विद्यार्थ्यांकडून आली होती की अन्य कोणाकडून, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# शेळावे मंडळात अतिवृष्टीग्रस्त पिकांच्या पंचनाम्यांना सुरुवात

**दैनिक इनशॉट जळगाव**
**पारोळा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेळावे मंडळातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे अखेर सुरू करण्यात आले आहेत. खेडीढोक, मोहाडी, दहीगाव, शेळावे, चिखलोद, राजवड, हिरापूर धाबे व दगडी सबगव्हाण या गावांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष भेट देऊन पंचनामे करण्यात येत आहेत.



ेहाडी येथील ग्राम महसूल अधिकारी पराग पाटील यांनी शेतात जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी करून पंचनामे केले. त्यामुळे अनेक दिवसांपासून मदतीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

३१ जुलै रोजी झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे शेळावे मंडळातील बहुतांश गावांतील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यानंतर प्रशासनाकडून नुकसानग्रस्त भागाचा आढावा घेऊन पंचनाम्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

उपविभागीय अधिकारी मनीष गायकवाड, तहसीलदार डॉ. उल्हास देवरे आणि मंडळ अधिकारी उदय निंबाळकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात येत आहे.

यावेळी तलाठी सहाय्यक देवेंद्र पाटील, सुनील आबा पाटील, ज्ञानेश्वर पुंडलिक पाटील, प्रदीप राजपूत, शेळावे खुर्दचे पोलीस पाटील महेंद्र सांगळे, तसेच सागर पाटील, नितेश पाटील आणि परिसरातील मोठ्या संख्येने नुकसानग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या नुकसानीची अचूक नोंद घेऊन लवकरात लवकर शासनाकडून मदत मिळावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून व्यक्त करण्यात येत आहे.